दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ


विश्वास मागून मिळत नसतो. तो कमवावा लागतो


SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक दिल से दिल तक | I'TIME in TRAVEL INDUSTRY | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555



dainiklokaarambh@gmail.com



LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २९ मे २०२५ | अंक १६६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# आपल्या आमदारांची संख्या अधिक. अशात मागे हटू नका



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. नांदेड येथे सभा घेतल्यानंतर त्यांनी मुंबईकडे कूच केले. आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीतील भूमिकेसह इतर अनेक राजकीय घडामोडींबाबत या दौऱ्यात मंथन झाल्याचे समोर येत आहे. नांदेड दौऱ्यादरम्यान आपली संख्या अधिक मागे हटू नका. महायुतीमध्ये आपण मोठे भाऊ आहोत असे त्यांनी भाजप आमदारांना स्पष्ट बजावले. त्याचवेळी त्यांनी स्वपक्षीय आमदारांना कानमंत्र दिला. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अडचणीत वाढ होणार का? अशी चर्चा होत आहे. अमित शाह यांचा कानमंत्र अजित पवार यांची तक्रार करणाऱ्या आमदारांना यावेळी अमित शाह यांनी कानमंत्र दिला. आपल्या आमदारांची संख्या अधिक आहे. अशात मागे हटू नका. प्रशासन आणि सरकार पातळीवर कामांचा आक्रमकपणे पाठपुरावा करा. इतका पाठपुरावा करा की अजितदादा यांनी माझ्याकडे तक्रार करावी. अजित पवार यांच्याविरुद्ध तक्रार करू नका. उलट सर्व मंत्र्यांच्या मागे लागा अशी सूचना अमित शाह यांनी आमदारांना केली. आपल्या महायुती म्हणूनच पुढे जायचं आहे, असंह अमित शाह यांनी सांगितले.

## आमदारांनी केली दादांची तक्रार

अमित शाह हे नांदेड येथे आले असता काही भाजप आमदारांनी अजितदादांची त्यांच्याकडे तक्रार केली. अजित पवारांच्या कुरघोड्यांना रोखा असा नाराजीचा सूर भाजप आमदारांनी आळवला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे पण उपस्थित होती. दादांची तक्रार केल्यावर मोठे काही घडेल असे वाटत असतानाच अमित शाह यांनी या वादावर जालीम उपाय सुचवला आहे.

## काय केली तक्रार

अजित पवार हे भाजपाची ताकद कमी करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा सूर या आमदारांच्या तक्रारीचा होता. 2024 मधील विधानसभेतील भाजप आमदारासमोरील पराभूत उमेदवारांनाच दादा पाठबळ देत असल्याची तक्रार त्यांनी केली. भाजपा विरोधकांना अजितदादा ताकद पुरवत असल्याचा त्यांचा दावा होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजपाची ताकद कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचा दावा तक्रारकर्त्या आमदारांचा होता.

# शेतकरी बांधवांच्या अडचणींबाबत उपाययोजना करा आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी



बीड : बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध अडचणी आणि मागण्यांच्या संदर्भात शासन आणि प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन अणि प्रशासनाकडे केली आहे. या आहेत मागण्या अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी. सन २०२० व २०२३-२४ चा रखडलेला संपूर्ण पिक विमा सरसकट देण्यात यावा. तसेच जे शेतकरी विम्यापासून वंचित राहीले आहेत त्यांना १०० टक्के विमा देण्यात यावा. सन २०२३-२४ मधील अतिवृष्टी अनुदानाची रक्कम तात्काळ शेतकर्यांना वितरीत करावी. शेतीचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी मदत मिळावी. खरीप हंगामासाठी लागणारे बी बियाणे योग्य दरात मिळावेत. तसेच पारदर्शक आणि योग्य पद्धतीने शेतकर्यांपर्यंत पोहोचावेत. बीजोत्पादक व शेडनेट धारक शेतकर्यांचा पीक विमा योजनेत सामावेश करावा. तसेच त्यांना इतर सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच शासकीय नुकसान भरपाई मिळावी. बीज उत्पादक कंपन्यांना शेडनेट धारक शेतकऱ्यांच्या बाबत हिताचे निर्णय घेणे बंधनकारक करावे. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य जास्त भाव देण्यात यावा. शेतकरी बांधवांना सोलार पंप उपलब्धतेसाठी सुनियोजन व्हावे. कपाशी पिकाला किमान १२ ते १४ हजार रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीन पिकाला ८ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊन आर्थिक सहकार्य करावे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन आर्थिक बळकटी द्यावी. तसेच नवीन पीक कर्ज देण्यासाठी बँकाना तातडीने सुधारीत आदेश द्यावेत.

# आष्टीतील महिलेचे साडे आठ लाख रुपये किमतीचे दागिने एसटी बस प्रवासात चोरीला



कडा : श्रीगोंदा येथे लग्न समारंभासाठी गेलेल्या आष्टीतील महिलेचे साडे आठ लाख रुपये किमतीचे दागिने एसटी बस प्रवासात चोरीला गेले. आष्टी परिसरातील शिदेवाडी येथील सुलोचना रखमाजी केरुळकर ही महिला त्यांच्या मावस बहिणीच्या मुलाच्या लग्नासाठी घोगरगाव (ता. श्रीगोंदा) येथे दि.२३ मे रोजी गेली होती. शनिवार, दि.२४ मे रोजी विवाह समारंभ झाल्यानंतर याच गावातील त्यांच्या माहेरी भाऊ संतोष सूर्यभान बोरुडे यांच्या घरी त्या गेल्या. तेथे त्यांची मुलगीही पुण्याहून आली होती. यावेळी मुलीने तिचे दागिने आईकडे दिले. एक दिवस भावाच्या घरी राहिल्यानंतर के रूळकर या रविवार,दि. २५ रोजी घोगरगाव येथून अहेमदनगर जाण्यासाठी मंगळवेढा-अहेमदनगर बसमध्ये बसल्या. भावाचा मुलगा त्यांना सोडण्यासाठी आला होता. यावेळी त्यांनी मुलीचे व स्वतःचे असे सुमारे १५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकत्र करुन बॅगमधील एका कप्प्यात ठेवले होते. घोगरगाव येथून अहेमदनगर येथील चांदणी चौकात आल्यानंतर त्यांनी बॅग तपासून पाहिली दागिने नसल्याचे लक्षात आले. याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर ८ लाख ४५ हजार २०० रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहेत.

# शेज़ारच्यांच्या जाचाला कंटाळून नवविवाहितेने अंगावर डिझेल टाकून पेटवून घेतल

गेवराई : शेजारच्यांच्या जाचाला कंटाळून एका विवाहित महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेवराईतील सावता नगरमध्ये ही घटना घडली. अंगावर डिझेल ओतून या महिलेने स्वतःला पेटवून घेतलं. या घटनेत महिला ८० टक्के भाजली. महिलेची प्रकृती चिंताजनक असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई तालुक्यातील सावतानगर भागामध्ये ही घटना घडली. आमच्या मालकी हक्काच्या जागेमध्ये गटाराचे पाणी का सोडता? या कारणावरून पीडित महिला आणि शेजारच्यांमध्ये सतत भांडण होत होते. शेजारी राहणारे या महिलेसोबत सतत भांडण करत तिला जीवे मारण्याची धमकी देत होते. याच त्रासाला कंटाळून महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला.शेजारच्यांच्या त्रासाला कंटाळून नवविवाहित स्वाती पारखे या महिलेने अंगावरती डिझेल टाकून स्वतःला पेटवून घेतलं. या घटनेत पीडित महिला ८० टक्के भाजली असून तिच्यावर बीडच्या जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. ममाझ्या जीवाचं काही बरं वाईट झाल्यास हे लोक जबाबदार असतील असा जबाब या महिलेने पोलिसांना दिला आहे.

# राहुल कवठेकर यांच्या शेतातील आंब्याच्या बागे चे अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान



काल जे अवकाळी पावसामुळे पिठ्ठी येथील शेतकरी राहुल कवठेकर यांच्या शेतातील आंब्याच्या बाग अवकाळी पावसामुळे व वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडाचे आंबे खाली पडले व नुकसान मोठ्या प्रचंड प्रमाणात झाली, व सरकारांनी तातडीने पंचनामा करावा व योग्य ती मदत करावी अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे...

# आर.टी.देशमुख अनंतात विलीन, शोकाकुल वातावरणात जिजांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) आश्रू पुसत आणि हुंदके आवरत असलेल्या वृध्द माता भगिनी, मुश्किलीने आश्रू आवरणारे असंख्य कार्यकर्ते आणि आक्रोश करणारे देशमुख कुटुंबीय अशा शोकाकुल आणि भावपूर्ण वातावरणात माजी आमदार आर. टी. देशमुख जिजा यांच्या पार्थिवावर परळीत शासकीय शिष्टाचारात अंत्यसंस्कार करण्यात आले . जिजा यांच्या निवासस्थान परिसरात हजारोंच्या उपस्थितीत जिजांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. निष्ठा आणि प्रामाणिकपणाचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे जिजा असल्याचे प्रतिपादन पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले. माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे सोमवारी अपघाती निधन झाले. त्यांचा मुलगा बाहेर देशातुन आल्यानंतर आज बुधवार दिनांक २८ मे रोजी आ. टी. देशमुख यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पुर्वी आज पहाटे जिजांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. येथे सर्वांसाठी पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. माजलगांव, परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील नेते, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांनी रांगा लावुन आपल्या लाडक्या नेत्याचे अंतिम दर्शन घेतले. सकाळी १०.४५ वाजता अंत्ययात्रा निघुन ११ वाजता पार्थिव अंत्यसंस्कार करण्याच्या ठिकाणी आले. यावेळी प्रथम शासनाच्यावतीने पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर खा. बजरंग सोनवणे, खा. ओमराजे निंबाळकर, आ. राजेश विटेकर, डॉ. रत्नाकर गुट्टे, सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे, अक्षय मुंदडा, शासनाचे प्रतिनिधी अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरांगे, ऊप जिल्हाधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. नंतर वेदीक पध्दीने मंत्रोच्चाराच्या घोषात जेष्ठ पुत्र. देशमुख यांनी जिजांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यावेळी आ. राजेश विटेकर, डॉ. रत्नाकर गुट्टे, खा. ओमराजे निंबाळकर, खा. बजरंग सोनवणे, फुलचंद कराड आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी माजी मंत्री पंडितराव दौंड, माजी आमदार बाजीराव जगताप, डॉ. मधुसुदन केंद्रे, सौ. संगिता ठोंबरे, नांदेड पोलिस महासंचालक शहाजी उमाप, सौ. उषाताई दराडे आदी उपस्थित होते.

निष्ठा आणि प्रामाणिकपणाचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे माजी आमदार आर. टी. देशमुख उर्फ जिजा असल्याचे आज राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. जिजा यांच्या अंत्यसंस्कारावेळी शोकसभेत बोलतांना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. जिजांच्या अपघातामुळे मला पुन्हा एकदा २०१४ ची आठवण झाली. कारण तुझा सुद्धा आमच्या घरातीलच व्यक्ती होत. कुठलाही गर्व नसलेला, प्रेमळ, स्वज्वळ आणि एवढा नम्र माणुस भेटने शक्य नाही. जिजांनी आमच्यावर माया केली, प्रेम दिले. शेवटच्या श्वासापर्यंत देशमुख कुटुंबासोबत राहणार असल्याची. ग्वाही त्यांनी.दिली.-मंत्री पंकजा मुंडे

## संपादकीय

### प्रेम, प्रतिष्ठा आणि हुंड्याच्या नावाखाली संपलेलं आयुष्य – वैष्णवी हगवणे प्रकरणावर एक प्रकाशझोत



संजय पाटील ( समाजप्रबोधनासाठी समर्पित ) १६ मे २०२५ रोजी पुण्यात घडलेले वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण हे आपल्या समाजात आजही खोलवर रुतून बसलेल्या हुंडा प्रथेचे व विकृत प्रतिष्ठेच्या हव्यासाचे दाहक उदाहरण आहे. हे प्रकरण फक्त एका मुलीच्या मृत्यूपुरते मर्यादित नाही, तर ते अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करणारे, अंतर्मुख करणारे आणि जागृतीसाठी आवश्यक ठरणारे आहे. वैष्णवी हगवणे हिचं लव्ह मॅरेज होतं. प्रेमविवाहातून उभं राहिलेलं हे नातं, जे स्वेच्छेने सुरु झालं, तेच हुंड्याच्या लोभात आंधळ्या झालेल्या सासरच्यांच्या अमानुषतेमुळे इतकं विद्रूप झालं की तिने आत्महत्या करण्याचा मार्ग स्वीकारला. प्रेमविवाह असूनही सासरच्या लोकांनी लग्नास सुरुवातीला विरोध केला. पण नंतर फॉर्च्युनर कार, ५१ तोळे सोनं, ९ तोळे चांदी व लाखोंचा खर्च करून थाटामाटात लग्न लावून घेतलं. एवढ्यावरच समाधान न मानता, त्यांनी पुढे २ कोटी रुपये मागितले. हे म्हणजे नातं नव्हे, एक प्रकारची सौदा आणि फसवणूक झाली. ही घटना समोर आल्यानंतर एक प्रश्न सारखा सतावत राहतो की, जर हे प्रेमविवाह होतं, तर त्या मुलीला त्या मुलाच्या स्वभावातील दोष दिसले नाहीत का? की सामाजिक, राजकीय प्रतिष्ठेच्या झगमगाटात ती झपाटली गेली? “प्रेम आंधळं असतं” असं म्हणतात, पण जोडीदार निवडताना विवेक शाबूत ठेवणं अत्यावश्यक आहे. आयुष्यभराचे निर्णय क्षणिक आकर्षणांवर किंवा भासलेल्या प्रतिष्ठेवर आधारित असू शकत नाहीत. शिक्षण कितीही झालं, स्वावलंबन असलं तरी पालकांचा अनुभव हा कायम मार्गदर्शक असतो. सध्या अनेक राजकीय, प्रतिष्ठीत घराण्यांमध्ये गुंडगिरी, व्यसनाधीनता, दादागिरी दिसून येते. अशा ठिकाणी मुलींच्या पालकांनी विशेष दक्षता घ्यायला हवी. कोणत्याही खोट्या प्रतिष्ठेला भाळून आपण आपल्या मुलीचं आयुष्य अंधारात लोटू नये. वैष्णवी शिक्षित होती, पण... वैष्णवी हगवणे हिचं प्रेमपूर्वी व विवेकाने विश्लेषण होणं गरजेचं होतं. तिनं स्वतःच्या कुटुंबाचा विचार करायला हवा होता. ज्या आई-वडिलांनी तिला लहानाचं मोठं केलं, त्यांचं दुःख समजून घेतलं पाहिजे होतं. आपण स्वतंत्र निर्णय घेण्याच्या नादात कधी कधी आपल्याच जिवाभावाच्या माणसांचं आयुष्य उध्वस्त करतो. प्रेम आणि हुंडा? जर हे प्रेमविवाह होतं, तर ५१ तोळे सोनं, महागडी कार यांचा काय संबंध? यातून स्पष्ट होते की, प्रेमाच्या नावाखाली प्रतिष्ठेचा देखावा करण्यातच अधिक रस होता. जेव्हा प्रेमाला वस्तूंनी मोजलं जातं, तेव्हा तिथं प्रेम नष्ट होतं आणि सौदाच उरतो.

दुखःद शेवट, पण शिकवण असलेला अध्याय

वैष्णवीने जे सहन केलं, त्यासाठी तिला दोष देणं चुकीचं आहे, पण तिच्या अनुभवातून समाजाला, पालकांना, मुलींना आणि मुलांनाही शिकायला हवं. जर सासरचा छळ असह्य वाटत असेल, तर काडीमोड घेऊन आपल्या आई-वडिलांकडे परत यावं. आत्महत्या हा पर्याय नाही. आपल्या बापाला, आपल्या मायबापाला अशा नालायक माणसांसमोर झुकवणं चुकीचं आहे. वैष्णवीचा बाप भिकारी नव्हता, हे ती विसरली.

तरुण पिढी आणि मुलींची चुकीची पसंती

आजचा एक कटू सत्य अनुभव म्हणजे __शांत, शालीन, कष्टाळू, निर्व्यसनी आणि साधे मुलं बहुजन समाजातील मुलींना बुळवटे वाटतात, पण धटिंग, व्यसनी, फिल्मी स्टाईलने वावरणारी मुलं त्यांना आकर्षित करतात. हे खरं आहे की, हे विचार विवेकहीन आहेत __पण हेच वास्तवदेखील आहे. समाजाने यावर मनन केलं पाहिजे.थोडक्यात वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येने एकदा पुन्हा हुंडा या दुष्ट प्रथेचं भयाण स्वरूप आपल्या समोर आणलं आहे. आता वेळ आली आहे की समाजाने प्रेम, प्रतिष्ठा आणि हुंडा याबाबत नवी दृष्टी स्वीकारावी.

# आपत्तीचा पावसाळा आजार
# सर्दी तर होणारच ना...!

पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो. पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे (common cold) हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो. साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम. विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये. आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम. आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण 70 टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे. पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे. पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल. पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे. आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**(जिल्हा माहिती अधिकारी) बीड**
**चलभाषा क्र. 9823199466**

# मान्सूनच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरु

बीड दि. 28 :- यंदा मान्सूनचे आगमन नेहमीपेक्षा लवकर झाले आहे आणि पावसाचे प्रमाण अधिक आहे. येणाऱ्या काळात हे प्रमाण जादा राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. या काळात आपत्कालीन परिस्थितीत मदती करिता जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. 24 तास सुरू राहणाऱ्या या नियंत्रण कक्षाचा क्रमांक 02442-299299 हार्दिक आहे. नागरिकांना या क्रमांकावर मदतीसाठी कॉल करता येईल असे जिल्हा प्रशासना करते कळविण्यात आले आहे. यासंदर्भात जारी प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे की, जिल्हा प्रशासनामार्फत मान्सुन 2025 पुर्व तयारी अनुषंगाने संबंधित यंत्रणांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत-

1. पूर्वतयारी (Pre-Flood Preparedness): •धोक्याची पूर्वसूचना देणे: हवामान खात्याच्या माहितीवरून नागरिकांना त्वरित इशारा देणे (SMS, ध्वनी प्रणाली, ग्रामसेवक/पोलीस मार्फत). • आपत्ती व्यवस्थापन पथके तयार ठेवणे: NDRF, SDRF, स्थानिक होमगार्ड्स, आरोग्य सेवक, पोलीस आदींची पथके सज्ज ठेवणे. • सुरक्षित ठिकाणांची निवड: शाळा, पंचायत कार्यालय, मंदिरे यांसारखी सुरक्षित उंच ठिकाणे निवडून तिथे नागरिकांना हलवण्याची योजना तयार ठेवणे. • वाहतूक व्यवस्था: मुख्य रस्त्यांवर आणि पूरप्रवण भागांत वाहतूक नियंत्रित ठेवणे.

2. पूरस्थितीत तातडीची कार्यवाही (Emergency Response): • लोकांचे स्थलांतर: पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे. वृद्ध, महिला, लहान मुले यांना प्राधान्य. • आपत्ती निवारण केंद्र उभारणे: अन्न, पाणी, औषधे, शौचालय व विश्रांती यांची सोय असलेली केंद्रे उभारणे. • आपत्कालीन आरोग्य सेवा: प्राथमिक उपचार केंद्र उभारणे, रुग्णवाहिका सज्ज ठेवणे. • बचाव कार्य: जलद बचाव कार्यासाठी बोटींनी आणि गोताखोरांच्या साहाय्याने अडकलेल्या लोकांना बाहेर काढणे.

3. पूरानंतरची कार्यवाही (Post-Flood Recovery): • सफाई व निर्जंतुकीकरण: पाण्याचा निचरा झाल्यानंतर गावाची सफाई व रोगप्रतिकारक उपाय (फवारणी, पिण्याच्या पाण्याची तपासणी). • आरोग्य तपासणी: साथीचे रोग पसरू नयेत म्हणून मोफत आरोग्य तपासणी शिबिरे. • सरकारी मदतीचे वितरण: नुकसान भरपाई, अन्नधान्य, निवारा, कपडे यांचे वितरण. • वित्तीय मदत: घरांचे नुकसान, शेतीचे नुकसान, जनावरांचे मृत्यू याबाबत नुकसान भरपाईची प्रक्रिया सुरू करणे.

4. इतर उपाययोजना: • स्थानिक लोकांशी समन्वय: सरपंच, ग्रामसेवक, युवक मंडळ, स्वयंसेवी संस्था यांच्याशी सहकार्य करून कार्यवाही करणे. • माहिती संकलन व अहवाल: नुकसानाचा अंदाज घेऊन जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर करणे. आधी सर्वांसाठी शासन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर नियंत्रण कक्ष 02442-299299 स्थापन करण्यात आले असून नागरिकांनी आपत्कालीन स्थितीमध्ये संपर्क करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

# नाथपंथातील मुक्ताईने चिरकालीन चैतन्य निर्माण केले...
# ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ.रवींद्रजी भोळे

पुणे (दिघी): मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ ,गहिनीनाथ, निवृत्तीनाथ यांचा साक्षात्कारी प्रभाव असलेल्या आदिशक्ती मुक्ताई नाथपंथातील महान संत होत्या. ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्तव्यापासून परांगमुख होत असताना कर्तव्य करण्याचा सल्ला दिला तद्वतच मुक्ताईने संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांना कर्तव्यापासून परंगमुख होत असताना ताटीच्या अभंगाद्वारे जगाचे कल्याण करण्याचा मंत्र दिला. तसेच महान योगी,तपस्वी चांगदेवांना गुरु मंत्र देऊन त्यांचे गर्वहरण



करून त्यांना शिष्य बनवले.आदिशक्ती मुक्ताई यांनी चिरकालीन चैतन्य निर्माण केले. नाथपंथातील आदिशक्ती मुक्ताई यांनी ताटीच्या अभंगाद्वारे जगाला महान संदेश दिला. तसेच मुक्ताईने चिरकालीन चैतन्य निर्माण केले असे मत ज्येष्ठ समाजसेवक ,प्रवचनकार ह भ प हिंदू रत्न डॉ.रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. श्री संत आदिशक्ती मुक्ताई देवस्थान च्या वतीने द्वितीय वर्धापन दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. रवींद्र भोळे पुढे म्हणाले की ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे, सोपान देवांनी पुरंदर येथे, निवृत्तीनाथांनी पैठण येथे समाधी घेतली. जलसमाधी, तटस्थ समाधी, तंत्र समाधी, पवित्र समाधी, चिरंजीव समाधी व संजीवन समाधी असे समाधीचे वर्णन असून अष्टांग योगातील यम, नियम, आसन, प्राणायाम ,प्रत्याहार ,ध्यान, धारणा ,यातील समाधी हे अत्यंत उच्च परमात्मा स्वरूप होण्याची अवस्था आहे. चित्त व आत्मा पंच महा भुतांमध्ये विलीन करून चैतन्य निर्माण करणे व जगामध्ये चेतना निर्माण करणे हा उद्देश्य समाधीचा आहे. मात्र आदिशक्ती मुक्ताईने शरीर व आत्मा पंचमहाभूतांमध्ये विलीन करून पूर्ण ब्रम्हांड तेजोमय केले.

# आरोग्य विभाग कोमात अन महावितरण जोमात ;
# वीजजोडणीच नसलेल्या च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला ९० हजारांचे वीजबिल :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.२८) बीड तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणी नसल्याने परीसरातील ग्रामस्थांना वीज जोडणी अभावी प्रसुती, शस्त्रक्रिया,आंतररूग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नसल्याने रूग्णांची हेळसांड होत असुन रूग्णांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करून बीड येथे जावे लागते. वीजे अभावी रूग्णांची हेळसांड थांबावी म्हणून वीज जोडणीसाठी निधी मिळावा यासाठी डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निवेदने व आंदोलनाच्या माध्यमातून १० लक्ष रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाकडून मंजूर करून घेतला असताना एकीकडे त्याचे अद्याप काम सुरू नसताना आणि वीज जोडणी नसताना महावितरणचे तब्बल ९० हजार रुपये वीजबिल आले असुन संबंधित प्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ.मदन काकड यांनी सहाय्यक अभियंता म.रा. वि.वि.कं.नवगण राजुरी बीड यांना प्राथमिक आरोग्य केंद्र च-हाटा येथे अद्याप विद्युत जोडणी झालेली नसतानाही येत असलेल्या विजबील बाबतीत शहानिशा करून वीजबील येणार नाही याची दक्षता घ्यावी असे लेखी पत्राद्वारे कळवुनही दर महिन्याला वीजबील येतच असुन हा आकडा ९० हजारांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे एकंदरीतच आरोग्य विभाग कोमात आणि महावितरण जोमात असं म्हणण्याची वेळ आली असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या जलसमाधी आंदोलनानंतर वीज जोडणीसाठी १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर मात्र काम अद्याप सुरूच नाही :- डॉ.गणेश ढवळे

बीड तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने ८ वर्षांपूर्वी तब्बल ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असुन सुरूवातीपासुनच वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली आहे. वीजजोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , च-हाटा येथील शेख युनुस,सुदाम तांदळे, मनोज तांदळे, सुभाष




बांगर,संपत नागरगोजे, सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव,भगिरथ उबाळे,बप्पासाहेब पवार आदींनी दि.१४ आक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन केले होते.त्यानंतर याची दखल सीईओ जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणासाठी विद्युत रोहित्र बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत १० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली होती. मात्र अद्याप काम सुरूच करण्यात आले नाही. यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाला यांचे गांभीर्य दिसून येत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २९ मे २०२५
https://lokaarambh.com


# महाडीबीटी पोर्टलवर बियाणे अनुदानासाठी अर्ज सादर करण्याची आज शेवटची संधी




प्रतिनिधी खरीप हंगाम 2025 साठी कृषी विभागाच्या महाडीबीटी शेतकरी योजना पोर्टलवर बियाणे अनुदानासाठी अर्ज भरण्याची आज (29 मे) शेवटची तारीख आहे. या योजनेत शेतकऱ्यांना प्रमाणित व प्रात्यक्षिक बियाण्यांसाठी अनुदानाचा लाभ मिळणार आहे. समाविष्ट पिके: सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, भात इत्यादी खरीप हंगामातील पिकांसाठी ही सुविधा लागू आहे. महत्त्वाची माहिती: अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत: 29 मे 2025 बियाणे सोडत कालावधी: 1 ते 3 जून 2025 अर्ज ऑनलाईन पद्धतीने पोर्टलवर सादर करावा लागेल. "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर आधारित सोडत प्रक्रिया होणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना नोंदणीकृत मोबाईलवर निवडीचा SMS पाठविण्यात येईल. फक्त निवड झालेल्या लाभार्थ्यांनाच अनुदानित बियाणे वितरित करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज सादर करून अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## वरठी कृषी केंद्राचे भव्य उदघाटन सोहळा संपन्न

लोही प्रतिनिधी दि. २८ मे २०२५): कृषी क्षेत्रातील विश्वासार्ह नाव म्हणून उदयाला आलेल्या वरठी कृषी केंद्र, लोही या नवीन केंद्राचा भव्य उद्घाटन सोहळा बुधवार, दिनांक २८ मे २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. राजुभाऊ शिंदे (तालुका कृषी अधिकारी) होते. तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. किशोरिलालजी डागा (डागा इलेक्ट्रॉनिक्स, दारव्हा) यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. राममंदिरासमोर, लोही येथे नव्याने सुरू झालेल्या या कृषी केंद्रामार्फत शेतकऱ्यांना आधुनिक शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य, मार्गदर्शन व सेवा उपलब्ध होणार आहे. या प्रसंगी श्री. संजय सुखदेव वरठी, श्री. पुरुषोत्तम सुखदेव वरठी व प्रो.प्रा. कमल संजय वरठी यांची




उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. त्यांनी शेतकऱ्यांच्या सेवेसाठी हे केंद्र सुरू करत असल्याचे सांगून कृषी क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास परिसरातील अनेक मान्यवर, शेतकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालक व विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी : शाळा 1 व 15 जूनपासून सुरू होणार




मुंबई (प्रतिनिधी) : राज्यात नवीन शैक्षणिक वर्षाची जोरदार तयारी सुरू झाली असून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) शाळा १ जून २०२५ पासून, तर राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (SSC) शाळा १५ जून २०२५ पासून सुरू होणार आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची उत्सुकता निर्माण झाली असून पालकांनीही तयारीला सुरुवात केली आहे. शालेय साहित्याची खरेदी, गणवेश, वह्या-पुस्तके यांची तयारी लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता असून ग्रामीण भागातील पालकांसाठी हे नियोजन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. स्थानिक व्यावसायिकांनाही याचा फायदा होण्याची शक्यता आहे. नवीन अभ्यासक्रमाची शक्यता; शिक्षकांना प्रशिक्षण यंदाच्या शैक्षणिक वर्षात नवीन अभ्यासक्रम लागू होण्याची शक्यता आहे. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' अंतर्गत शिक्षण पद्धतीत अनेक सुधारणा केल्या जाणार असून डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरूम्स आणि विद्यार्थीनिहाय उपक्रमांची संख्या वाढवली जाणार आहे. त्यामुळे शिक्षक वर्गाला विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे. प्रशासनाची तयारी आणि अडचणी राज्यातील अनेक शाळांमध्ये अद्यापही प्रशासकीय व शिक्षक नेमणुका रखडल्या असल्याने काही अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होऊ नये, यासाठी शासनाने वेळेत उपाययोजना करणे गरजेचे आहे. शाळा सुरू होण्याआधीच स्वच्छता, दुरुस्ती व नियोजनाची कामे पूर्ण करावीत, असे शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे. शाळांची तयारी पूर्ण करून विद्यार्थी-पालकांनी आत्मविश्वासाने नव्या वर्षाची सुरुवात करावी, हीच अपेक्षा! (Maharashtra School News)

# जवाहर विद्यालय पाचोड येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी, पाचोड विवेकानंद शिक्षण संस्था संचलित जवाहर विद्यालय, पाचोड येथील सन २००२-०३ च्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दिनांक २८ मे २०२५ रोजी अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या निमित्ताने जुने विद्यार्थी पुन्हा एकत्र आले आणि शालेय आठवणींना उजाळा देत गोड सहवासाचा आनंद लुटला. कार्यक्रमाची सुरुवात माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत, स्वागत व उदघाटनाने झाली. यावेळी मुख्याध्यापक प्रभाकर खंबाट कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर उद्घाटन विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षयभाऊ शिसोदे यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय प्रा. राजकुमार भुमरे, सुभाष अवघड, विजय लिहिणार, उमेश नारळे, प्रभाकर कांबळे, शहादेव खंडागळे, काथार सर, तसेच सेवानिवृत्त शिक्षक चितळे सर, परदेशी सर, लांडे सर, गुजर सर, बढे सर यांसह अनेक मान्यवर व शिक्षक उपस्थित होते. भावनिक गप्पा, सादरीकरण



आणि सृजनशीलतेचा उत्सव कार्यक्रमात जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपले शालेय जीवनातील अनुभव शेअर केले. काहींनी आपले कला-कौशल्य सादर करून वातावरण भारावून टाकले. विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, संवाद सत्र व मनमोकळ्या गप्पा यामुळे संपूर्ण दिवस उत्साहाने व आनंदात गेला. कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने झाले होते. माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाने व शिक्षकांच्या उपस्थितीने शाळेतील भावनिक नात्यांचे पुन्हा एकदा दर्शन घडवले. एकत्र येण्याचा आनंद, नात्यांचा सन्मान स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून एकमेकांशी जुळलेली मैत्री अधिक घट्ट झाली. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेबद्दलचा अभिमान व्यक्त केला. हा स्नेहमेळावा फक्त एक कार्यक्रम नव्हता, तर आठवणींचा अमूल्य ठेवा होता, जो सर्वांच्या मनात आयुष्यभरासाठी घर करून

# शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना: 'Farmer ID' साठी लवकरात लवकर अर्ज करा – शासनाची विनंती

प्रतिनिधी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शासनाने महत्त्वाचे आवाहन केले असून, 'Farmer ID' (शेतकरी ओळखपत्र) साठी त्वरित अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हे ओळखपत्र शासनाच्या विविध योजना, अनुदान व सुविधा मिळवण्यासाठी अनिवार्य ठरणार आहे. त्यामुळे कोणताही विलंब न करता, शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करून आपली नोंदणी पूर्ण करावी, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. 'Farmer ID' का आवश्यक आहे? शासनाच्या विविध कृषी योजना, अनुदाने, विमा योजना, सौरपंप, खत व बियाण्यांचे अनुदान, पीक सर्वेक्षण, व ई-नाम सारख्या डिजिटल सेवा यांचा लाभ




मिळवण्यासाठी Farmer ID हे एकमेव आधारभूत दस्तऐवज म्हणून वापरले जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याची माहिती एका संगणकीय प्रणालीमध्ये केंद्रीकृत स्वरूपात उपलब्ध होणार आहे. अर्जाची प्रक्रिया कशी करावी? अर्ज पद्धत: ऑनलाइन (कृषी विभागाच्या अधिकृत पोर्टलवरून) आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक खाते तपशील, मोबाईल नंबर इत्यादी नोंदणीची अंतिम तारीख: अद्याप स्पष्ट नाही, परंतु लवकरात लवकर अर्ज करण्याचे आवाहन शेतकऱ्यांनी काय करावे? जवळच्या सेवा केंद्रात संपर्क साधा किंवा स्वतःच्या मोबाईल/कॉम्प्युटरवरून ऑनलाइन अर्ज करा नोंदणी पूर्ण झाल्यावर दिलेला 'Farmer ID' क्रमांक सुरक्षित ठेवा शासनाचा संदेश स्पष्ट आहे 'Farmer ID' हे तुमच्या शेतीसाठी आधारस्तंभ ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करून योजनांचा लाभ घेण्यासाठी सज्ज व्हावे.

# वारसा साहित्य मंचाचे पहिले राज्यस्तरीय वारसा कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर - वारसा साहित्य मंचाच्या वतीने आयोजित दिनांक 25 मे 2025 रोजी मराठवाड्याचे मुख्यालय असणाऱ्या ऐतिहासिक नगरी छत्रपती संभाजीनगर येथे जिजाऊ मंदिरामध्ये पहिले राज्यस्तरीय वारसा कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक मा. भारत सातपुते (लातूर) यांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका मा. प्रिया धारूरकर होत्या, तर स्वागताध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध गझलकार मा. रज्जाकभाई शेख आणि प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध गझलकार मा.बाळासाहेब गिरी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वारसा साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष कवी श्री अर्जुन गायकवाड यांनी केले ज्यामध्ये वारसा साहित्य मंचाचे राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमा विषयी माहिती दिली.भविष्यातील उपक्रम , साहित्य मंचाचे उद्दीष्टे सांगितले.राज्यभरातील ६० कवी-कवयित्रींनी आपल्या सुमधुर कवितांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना मा.भारत सातपुते यांनी सांगितले की, लेखकांनी पुस्तक प्रकाशना सोबत पुस्तक वितरणा कडेही लक्ष दिले पाहिजे. कविता हा श्वास झाला पाहिजे तसेच लिखाणात सातत्य असलं पाहिजे. सरांनी वास्तवादी हुंडाबळी वर आधारित कविता सादर केली.
या संमेलनात चार कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले ज्यामध्ये काव्यगंध प्रकाशन अंतर्गत कवी श्री. अर्जुन गायकवाड संपादित 'वारसा प्रतिनिधिक काव्यसंग्रह, कवी श्री. ज्ञानदेव डिघुळे लिखित 'आप्पा शब्दांचे दर्पण, समिक्षा प्रकाशन निर्मित कवयित्री रेखा बावा लिखित 'साद मनाची व गुरुमाऊली प्रकाशित कवयित्री मनिषा पिंगळकर - जाधव लिखित 'जन्म बाईचा बाईचा'. या चारही प्रकाशित काव्यसंग्रह विशेष आकर्षण ठरली. स्वागताध्यक्ष सुप्रसिद्ध कवी, गझलकार मा. रज्जाकभाई शेख यांनी वारसा साहित्य संमेलनाला शुभेच्छा दिल्या. तसेच बाप, प्रेम या विषयावर अप्रतिम गझल सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# कृषी सेवा केंद्र की शेतकरी लूट केंद्र.

सेवा नाही लूट करायला परवानगी असलेलं ठिकाण. म्हणजे कृषी सेवा केंद्र असंच वाटतं. आज कापुस बियाणं घेण्यासाठी गेलो असता. कापुस बियाणं एक 450ग्रॅम. म्हणजे सुमारे अर्धा किलो पेक्षा कमी असलेली बियाणे पिशवी. हि एका पिशवी चीं किंमत आज नुऊशे( 900) रुपये किमतीला मिळाली. मागील वर्ष्या पर्यत 750 रुपये पर्यंत मिळतं असलेली थैली आता 900 रुपयात विकली जातेय. मी दुकानदार यांना सांगितलं की शेजारच्या जिल्यात आठशे पन्नास रुपयात कुठलं पण वाण घ्या 850 रुपये किंमत आहे. जळगाव जिल्यात पन्नास रुपये जास्त का? तर त्यांच म्हणणं होतं आमची काल जिल्यात मिटिंग झाली.बियाणं कंपनी चीं. कोणीही 900 रुपये किंमत पेक्षा कमी किमतीत बियाणे विकायचं नाही. जो दुकानदार ठरलेल्या किंमत पेक्षा कमी किमतीत विकेल त्याच्यावर कंपनी कडक कार्यवाही करेल. याचा अर्थ लुटा जास्तीत जास्त किंमत घ्या पण कमी किंमत मध्ये कोणता दुकानदार कमी भावात विकेल ते चालणार नाही. हि कुठली नीतिमत्ता आली बियाणं कंपनी मालकांची . जास्त वसूल करा पण कमी पैसे घेतले तर चालणार नाही. हा तर आमच्या कडील शेतकरी भाषेत शुद्ध हरामखोर पणाचं. असो हे झालं किरकोळ विक्रीते बाबत त्यांच्या बाबत बियाणं विक्री कंपनी नी ठरवलेलं धोरण. त्याहून कळस यांचे तर खूपच भयानक शेतकरी लूट षडयंत्र असंच वाटतं. उदाहरण म्हणून सांगतो एक क्विंटल कापुस हा शेतकरी कडून आज पर्यंत साधारण भारतातील सर्वात जास्त भाव हा सुमारे दहा हजार रुपये क्विंटल हा आहे. शेतकऱ्यांना आज पर्यंत मिळाला नाही आज पर्यंत तरी आपण दहा हजार रुपये किंमत असलेला कापुस हा एक क्विंटल घेतला त्यात सुमारे साठ किलो सरकी बी मिळतं. म्हणजे दहा हजार रुपये किंमत असलेला कापुस मधून बियाणे हे साठ किलो मिळते. साठ किलो फक्त आपण सरकी किंमत धरली तरी सुमारे अंदाजित एक किलो सरकी हि 166.66 रुपये किंमत येते. अर्धा किलो (500ग्रॅम)फक्त 83 रुपये. बियाणे कपंनी फक्त 450 ग्रॅम कापुस बियाणे हे पिशवीत भरते. म्हणजे सुमारे जगातील सर्वात जास्त बाजारमूल्य भाव पकडला तरी 450 ग्रॅम बियाणं हे फक्त70 रुपये. ते 80रुपये. मूल्य असतं. या उपर जास्त किंमत असूच शकतं नाही. आपण कंपनी प्याकिंग खर्च व ईतर सर्व खर्च मिळून सर्व हा 20 रुपये घेतला तरी. बाजारात कंपनी ने होलसेल विक्रीत्याला शंभर रुपये मूल्य भावात मिळायला हवं. आणि किरकोळ व्यापारी यांनी सुमारे 125 ते 150 रु. च्या आतील किमतीत शेतकऱ्यांना बियाणं मिळायला हवं. पण कंपनी, होलसेल व्यापारी, कृषी केंद्र चालक, कंपनी करतं असलेली जाहिरात, कंपनी करतं असलेला अफाट खर्च. अफाट नफा सर्वांना वाटतं असल्यामुळे सर्व घटक मजा करतांना दिसतो आणि शेतकरी रडतांना दिसतो. संकरीत वाण आले आणि शेतकरी नागवला जातोय हेच सत्य आहे.सर्व शेतकरी वर्ग कडून सर्व लुटतात

# एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा गिरीश महाजन यांच्यावर जोरदार हल्लोबल करत गंभीर आरोप केले

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गिरीश महाजन वारंवार माझ्याबाबत फेकाफेकी करत असतात, कोट्यवधीची मालमत्ता गिरीश महाजन यांच्याकडे कशी आली? महाजन हे भाड्याच्या खोलीमध्ये राहत होते, एका शिक्षकाचा मुलगा आणि एवढी संपत्ती कुठून आली? असा सवाल यावेळी एकनाथ खडसे यांनी केला आहे. नेमकं काय म्हणाले खडसे? एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गिरीश महाजन वारंवार माझ्याबाबत फेकाफेकी करत असतात. मागच्या वेळेसही गिरीश महाजन म्हणत होते की कोथळीची ग्रामपंचायत खडसेंची नाही म्हणून, पण त्यांना सांगायचं आहे की गेल्या 37 वर्षांपासून कोथळीची ग्रामपंचायत माझ्या ताब्यात आहे. मंदाकिनी खडसे या जेलमध्ये जाणार होत्या, पण मी त्यांना वाचवलं असंही गिरीश महाजन यांनी म्हटलं. मला जामीन मिळाला तो सुप्रीम कोर्टातून मिळाला, मग महाजन एवढे का फेकत आहेत? असा टोला यावेळी खडसे यांनी महाजन यांना लगावला. मला आणि माझ्या बायकोला जेलमध्ये पाठवण्यासाठी त्यांनी जंग जंग पछाडले, असा आरोपही यावेळी खडसे यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, कोट्यवधीची मालमत्ता गिरीश महाजन यांच्याकडे कुठून आली? महाजन हे भाड्याच्या खोलीमध्ये राहत होते, ते एका शिक्षकाचा मुलगा आहेत,



मग त्यांच्याकडे एवढी संपत्ती कुठून आली? मी सात वर्षांचा होतो तेव्हापासूनच माझ्या नावावर शंभर एकर जमीन आहे, असंही यावेळी एकनाथ खडसे यांनी म्हटलं. दरम्यान धरणात जमीन जाणार आहे, या हेतून गिरीश महाजन यांनी जमीन विकत घेऊन 15 कोटी हडप केले. त्यावेळी मंत्री असताना महाजन यांनी पदाचा दुरुपयोग केला, असा आरोपही यावेळी खडसे यांनी केला आहे. इंदूर- हैदराबाद महामार्ग प्रकल्पामध्ये खडसेंची जमीन जाणार आहे, यावर प्रतिक्रिया देताना खडसेंनी जमीन आताच घेतली, मोबदला मिळावा यासाठी ही जमीन घेतली असा आरोप गिरीश महाजन यांनी केला होता, या आरोपांना उत्तर देताना खडसे बोलत होते.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय





# अमेरिकेने व्हिसावर निर्बंध लादले असले तरी दुतावासाने म्हटले - घाबरु नका संधी मिळेल

अमेरिकेच्या व्हिसा प्रक्रियेतील विलंब आणि पारदर्शकतेवर उपस्थित होणाऱ्या प्रश्नांदरम्यान, नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाने स्पष्टीकरण दिले आहे. दूतावासाने म्हटले आहे की व्हिसा अर्ज स्वीकारले जात असून ही प्रक्रिया पूर्णपणे अमेरिकन कायद्यांनुसार चालविली जात आहे. प्रत्येक अर्जदाराची सुरक्षा तपासणी मात्र आवश्यक आहे.पात्र अर्जदारांना संधी मिळणार असल्याने त्यांनी घाबरून जायची काहीही गरज नाही, असे दूतावासाने आश्वासन दिले आहे. अमेरिकेतील सध्याची परिस्थिती पाहता. तेथील व्हिसा प्रक्रियेबद्दल अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. यामध्ये व्हिसा अर्जांची पुनरावलोकन करण्यात होणारा विलंब आणि पारदर्शकतेचा अभाव यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. या सर्वांमध्ये, नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्याने परिस्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणतात की व्हिसा प्रक्रियेत कोणतीही हलगर्जीपणा नाही आणि संपूर्ण प्रक्रिया अमेरिकन कायद्यांनुसार चालते. नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे की ते अंतर्गत संवादावर भाष्य करत नाहीत. तथापि, त्यांनी निश्चितपणे स्पष्ट केले की व्हिसा अर्जदारांनी त्यांचे अर्ज सादर करत राहावेत. म्हणजेच अमेरिकेने व्हिसा प्रक्रिया कोणत्याही प्रकारे थांबवण्याचे किंवा मर्यादित करण्याचे कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. दूतावासाच्या प्रवक्त्याने काय म्हटले? प्रत्येक व्हीसा प्रकरणाची चौकशी आणि प्रक्रिया करण्यासाठी किती वेळ लागतो यावर अमेरिकन वाणिज्य दूतावासांची कार्यक्षमता अवलंबून असते. अमेरिकेची सुरक्षा आणि लोकांची सुरक्षितेता राखण्यासाठी ही चौकशी अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे प्रत्येक अर्जांची काळजीपूर्वक तपासणी केली जात आहे असे दूतावासाच्या प्रवक्त्याने म्हटले. व्हिसा प्रकरणांची चौकशी करताना,कोणताही अर्जदार अमेरिकेच्या सुरक्षेला धोका निर्माण करत नाही याची खात्री केली जाते. म्हणूनच प्रत्येक प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे आणि प्रक्रियेला थोडा जास्त वेळ लागू शकतो. परंतु सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा विलंब आवश्यक आहे असे या प्रवक्त्याने म्हटले आहे. अमेरिकन दूतावासाने या गोष्टी स्पष्ट केल्या सर्व अमेरिकन वाणिज्य दूतावास वेळोवेळी त्यांच्या कामाचे वेळापत्रक अपडेट करीत राहतात. जेणेकरून ते प्रत्येक प्रकरणाची संपूर्णपणे चौकशी करू शकतील. त्याचा उद्देश संपूर्ण चौकशीशिवाय कोणतीही व्यक्ती अमेरिकेत प्रवेश करू नये याची खात्री बाळगण्यासाठी असल्याचे दूतावासाने स्पष्ट केले आहे. व्हिसा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षा दोन्ही महत्त्वाचे आहेत. म्हणून, व्हिसा अर्जदारांनी घाबरू नये आणि त्यांची कागदोपत्री प्रक्रीया सुरुच ठेवावी, अमेरिका सुरक्षेशी तडजोड करीत नसली तरी जे योग्य उमेदवार आहेत. त्या पात्र अर्जदारांना संधी मिळेल असे या निवेदनाद्वारे अमेरिकन दूतावासाने स्पष्ट केले आहे.

## कोरोनाच्या नव्या व्हेरियंटची जगात दहशत, भारतात रुग्णांच्या संख्ये मोठी वाढ

भारत आणि अनेरिकेसह कोरोनाच्या नव्या व्हेरियंटने जगात दहशत माजवली आहे. अमेरिकेतील एक रिपोर्टनुसार, कोरोनाच्या नव्या व्हेरियंटबद्दल हैराण करणारी माहिती समोर आली आहे. नव्या व्हेरियंटसाठी अमेरिकेतील तज्ज्ञांनी चीनला जबाबदार मानलं आहे. नवा व्हेरियंट अधिक धोकादायक असल्याची माहिती देखील समोर येत आहे. पुन्हा एकदा कोविड-19 ने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेण्यास सुरुवात केली आहे. भारत, अमेरिका, सिंगापूर, जपान, फ्रान्स, स्पेन आणि तैवान सारख्या देशात कोरोना रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. अमेरिकेच्या आरोग्य मंत्रालयाने एक रिपोर्ट जारी केला आणि नव्या व्हेरियंट नाव NB.1.81 म्हणून घोषित केलं आहे. कोरोनाचा नवीन प्रकार मागील सर्व प्रकारांपेक्षा जास्त धोकादायक आणि जीवघेणा आहे. भारतात या संसर्गाने 1 हजाराहून अधिक लोकांना संसर्गित केले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. जगभरात भीती निर्माण करणाऱ्या कोरोनाच्या नवीन व्हेरियंटबद्दल आता अतिशय धक्कादायक माहिती समोर आली आहे. अमेरिका आणि अनेक तज्ज्ञांचा असा दावा आहे की या नवीन व्हेरियंटमागे चीनशिवाय इतर कोणीही नाही. अमेरिकन तज्ज्ञांचा दावा आहे की कोविड-19 चा नवीन प्रकार NB.1.81 प्रथम चीनमध्ये पसरला. चीनमधून हा व्हायरल आशियाई अनेक



देशांमध्ये पसरला. आता ते जगाच्या अनेक भागात पोहोचला आहे. चीन कोरोनाच्या नवीन प्रकाराचा खलनायक आहे ही शंका अधिकच गडद झाली आहे कारण चीन त्याच्याशी संबंधित माहिती लपवत आहे. चीनच्या शहरांमध्ये देखील कोरोनाच्या नव्या व्हेरियंटच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे... असं देखील सांगितलं जात आहे. मोठ्या संख्येने चिनी लोकांना याचा संसर्ग झाला परंतु जिनपिंग यांनी जगाला याबद्दल कोणतीही माहिती दिली नाही. सांगायचं झालं तर, चिनी लोकं अनेक देशांमध्ये प्रवास करत असतात. आता देखीन चीनने तेच केलं जे 2020 मध्ये केलं होतं. चीनने जगाला पुन्हा एकदा मोठी महामारी दिली आहे. आता संपूर्ण जगासमोर कोरोनाच्या नवीन व्हेरियंटशी सामना करण्याचं मोठं आव्हान आहे. कोरोनाचा धोका पुन्हा वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घेणं फार महत्त्वाचं आहे.

## एलन मस्क यांनी सोडली डोनाल्ड ट्रम्प यांची साथ, अमेरिकन प्रशासनातून वेगळा होण्याचा निर्णय



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे मानले जाणारे अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांनी ट्रम्प प्रशासन सोडली आहे. ट्रम्प यांचे सल्लागार पद सोडण्याची घोषणा एलन मस्क यांनी केली आहे. सोशल मीडियावर मस्क यांनी ही माहिती दिली. संघीय नोकरशाहीत सुधारणा करण्याचे काम मस्क यांनी केले होते. सरकारी खर्च कमी करण्याची जबाबदारी ट्रम्प यांनी मस्क यांच्यावर दिली होट्रम्प यांचे मानले आभार मस्क यांनी X वर पोस्ट लिहिली आहे. त्यात म्हटले की, विशेष सरकारी कर्मचारी म्हणून माझा कार्यकाळ संपत आहे. सरकारी खर्च कमी करण्याची संधी दिल्याबद्दल मी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानू इच्छितो. डीओजीई मिशन कालांतराने अधिक मजबूत होईल. कारण ते सरकार चालवण्याचा एक मार्ग बनेल. डीओजीईचे कामकाज पाहत असल्यामुळे मस्क आपल्या उद्योगाकडे लक्ष देऊ शकत नव्हते. डोनाल्ड ट्रम्प यांची राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी एलन मस्क यांना अमेरिकन सरकारमध्ये विशेष सरकारी कर्मचारी म्हणून नियुक्त केले होते. त्यानंतर गेली

## एवढा अहंकार कशाला? भारतीयांच्या ई-मेलला स्पॅम समजते, न्यूझीलंडच्या मंत्री बरळल्या

न्यूझीलंडच्या इमिग्रेशन मंत्री एरिका स्टॅनफोर्ड यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. यामागचे कारण म्हणजे त्यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन. एरिका स्टॅनफोर्डने काँग्रेसच्या अधिवेशनादरम्यान अधिकृत पत्रव्यवहारासाठी आपल्या वैयक्तिक जीमेल अकाऊंटचा वापर केल्याचा बचाव केला आहे आणि म्हटले आहे की त्या भारतीयांच्या ईमेलला कधीही उत्तर देत नाही कारण त्या त्यांना स्पॅमसारखे मानतात.

स्टॅनफोर्ड म्हणाल्या की, "मला अनेक ईमेल येतात, जसे की भारतातील लोक इमिग्रेशन सल्ला विचारतात, ज्याला मी कधीच प्रतिसाद देत नाही. मी त्यांना स्पॅमसारखेच वागवते."

'या' वक्तव्यावरून वाद सुरू

भारतीय वंशाच्या लेबर पक्षाच्या खासदार प्रियांका राधाकृष्णन यांनी हे वक्तव्य असंवेदनशील आणि भेदभावपूर्ण असल्याचे म्हटले आहे. 'इंडियन वीकेंडर'शी बोलताना राधाकृष्णन म्हणाल्या, 'अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे संपूर्ण समाजाविषयीच्या नकारात्मक रूढींना बळ मिळते. एखाद्या मंत्र्याने एका विशिष्ट वांशिक गटाला लक्ष्य करणे अमान्य आहे. त्या म्हणाले की, मंत्र्यांना दररोज ईमेल येतात, त्यामुळे भारतीयांपासून ईमेल वेगळे करण्यात अर्थ नाही. राधाकृष्णन म्हणाल्या की, "अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे लोकांच्या संपूर्ण समुदायाबद्दल नकारात्मक रूढींना बळ मिळते, विशेषत: न्यूझीलंडचे भारताशी असलेले विशेष संबंध लक्षात घेता."

## भारताची ३ शत्रू राष्ट्रं एकत्र आलीत,पर्वतरांगामध्ये राबवतायत कोणते सिक्रेट मिशन ?

भारत-पाक तणावकाळात मदत केल्याने पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आता उपकाराची परतफेड करण्यासाठी चार देशांच्या दौऱ्यावर आहेत. ६-७ मेच्या रात्रीपासून ते १० मे पर्यंत भारताशी पंगा घेतल्यानंतर या चार राष्ट्रांनी ( तुर्की, अझरबैजान, इराण आणि ताजिकिस्तान)पाकची अब्रु वाचवली होती. तुर्कीने दिलेल्या ड्रोनच्या जोरावरच पाकिस्थान लढाईच्या मैदानात भारताला आव्हान देत होता. परंतू त्यांचे सर्व ड्रोन नाकाम झाले. भारताच्या एस-४०० आणि इतर



संरक्षणप्रणाली समोर ते फेल गेले. एअरपोर्टचे उद्घाटन चार देशांच्या दौऱ्यावर गेलेल्या शाहबाज यांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात तुर्कीपासून केली होती. त्यानंतर ते इराणला पोहचले. मंगळवारी त्यांचे विमान अझरबैझान येथे उतरले. येथे पाकचे पंतप्रधान शाहबाज यांनी राष्ट्राध्यक्ष अलीयेव यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी एक्सवर त्यांनी लिहीलेय की, 'मला आज माझा प्रिय भाऊ राष्ट्राध्यक्ष अलीयेव यांच्या सुंदर आणि शांत शहर असलेल्या लाचिन येथे भेटून सन्मालित झाल्यासारखे वाटत आहे. अलिकडे पाकिस्तान-भारत संघर्षात पाकिस्तानला अझरबैझानने दिलेल्या भक्कम पाठींब्यासाठी धन्यवाद मानत आहे. आम्ही सर्व क्षेत्रातील पाकिस्तान- अझरबैजान संबंधांना अधिक दृढ करण्याचा आणि प्रादेशिक शांतता आणि समृद्धीसाठी एकत्र काम करण्याचा आमचा संयुक्त संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केला'. या दौऱ्यावर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज यांनी बुधवारी तुर्कीची राष्ट्राध्यक्ष अर्दोगन आणि अझरबैझानचे राष्ट्राध्यक्ष इह्लाम अलीयेव याच्या सोबत लाचिन इंटरनॅशनल एअरपोर्टचे उद्घाटन केले. लाचीन विमानतळ अर्मेनियासोबत २०२० च्या युद्धादरम्यान स्वंतत्र केलेल्या क्षेत्रांतील अझरबैझान याने बांधलेला तिसरा विमानतळ आहे.

# एस -४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली खरेदीबाबत भारतासोबत चर्चा सुरु : रशियाचे राजदूत

दहशतवादाविरोधात भारताने उचललेली पावले, सैन्याचे शौर्य आणि S-400 च्या वापराबाबत रशियाचे राजदूत डेनीस अलीपोव्ह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. भारताने आपली उद्दिष्टे स्पष्टपणे ठरवली असून त्यानुसार कारवाई केली आहे. भारताने दहशतवाद्यांना लक्ष्य केले असून त्यांचा नाश केला जाईल, असे अलीपोव्ह यांनी स्पष्ट केले. आमच्या माहितीनुसार, या कारवाईदरम्यान S-400




प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचाही त्यात समावेश होता. ही शस्त्रे अत्यंत प्रभावी ठरली, असेही त्यांनी सांगितले. रशियाचे राजदूत डेनीस अलीपोव्ह यांनी आयएएनएसशी बोलताना ही प्रतिक्रिया दिली. भारत आणखी S-400 हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याचा विचार करत असल्याच्या बातम्यांवर प्रतिक्रिया देताना अलीपोव्ह म्हणाले, या विषयावरही आमच्यात चर्चा सुरू आहे, जसे इतर अनेक मुद्द्यांवर आहे. दहशतवाद सीमापारचा असो किंवा अन्य कोणताही, त्याविषयी दुटप्पी धोरण असू नये, असे आम्ही नेहमी सांगत आलो आहोत, असं अलीपोव्ह यांनी सांगितले. ब्रह्मोस क्षेपणास्त्र भारतातच तयार करण्यात आले आहे. हे भारत-रशिया संयुक्त सहकार्यातून विकसित झालेले शस्त्र आहे. ही क्षेपणास्त्रे डिझाईन व उत्पादनासाठी आम्ही एकत्र काम करत आहोत. भविष्यातही अशा अनेक योजनांचा विस्तार करण्याचा आम्ही विचार करत आहोत, असे त्यांनी नमूद केले. ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या यशाबद्दल आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये S-400 प्रणालीच्या वापराबाबतही माहिती दिली. भारत आणि मॉस्को दरम्यान आणखी S-400 हवाई संरक्षण प्रणाली युनिट्सच्या खरेदीसंबंधी चर्चा सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com